# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 15 October 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १५ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- महाराष्ट्र विधानसभा आणि नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर– २० नोव्हेंबरला मतदान तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी
- माध्यमांनी मतदानाचे तसंच मतमोजणीचे कल जाहीर करतांना काळजी घेण्याचं मुख्य निवडणूक आयुक्तांचं आवाहन
- आचारसंहितेपूर्वी आरक्षणासंदर्भातल्या मागण्या मान्य न केल्याबद्दल मनोज जरांगे यांची टीका

आणि

- राज्यातल्या आणखी सहा जातींचा ओबीसीत समावेश करण्याची राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाकडून केंद्र सरकारला शिफारस

****

केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम आज जाहीर केला. केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी आज पत्रकार परिषदेत निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक एकाच टप्प्यात होणार आहे. आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे.

***निवडणुकीची अधिसूचना २२ ऑक्टोबरला जारी होणार असून, त्यादिवसापासूनच नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास सुरुवात होणार आहे. २९ ऑक्टोबरपर्यंत नामनिर्देशनपत्रं दाखल करता येणार आहेत. ३० ऑक्टोबरला अर्जांची छाननी तर चार नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. राज्यात मतदान २० नोव्हेंबर रोजी एकाच दिवशी होणार आहे.***

***नांदेडचे खासदार वसंत चव्हाण यांच्या निधनानं रिक्त झालेल्या लोकसभेच्या एका जागेच्या पोटनिवडणुकीसाठी याच टप्प्यात निवडणूक प्रक्रिया राबवली जाणार असून, २० नोव्हेंबरलाच मतदान घेतलं जाणार आहे.***
***लोकसभेच्या वायनाड मतदार संघाचे खासदार राहुल गांधी यांनी राजीनामा दिल्यानं रिक्त झालेल्या या जागेच्या पोटनिवडणुकीसाठी १३ नोव्हेंबर रोजी मतदान घेतलं जाणार आहे.***
***झारखंडमध्ये निवडणूक दोन टप्प्यात होणार आहे. पहिल्या टप्प्यात ४३ मतदार संघात १३ नोव्हेंबरला तर दुसऱ्या टप्प्यात ३८ मतदार संघांमध्ये २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे.***
***सर्व ठिकाणची मतमोजणी एकाच दिवशी २३ नोव्हेंबरला होणार असल्याचं राजीवकुमार यांनी सांगितलं.***

निवडणूक प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा पूर्ण वापर केला जाणार असून, आपल्या मतदान केंद्राची माहिती मतदारांना संबंधित संकेतस्थळावर पाहता येणार असल्याचं राजीवकुमार यांनी सांगितलं. महिला संचलित मतदान केंद्रांची स्थापना तसंच सर्व मतदान केंद्रांवर अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, मतदानासाठी आलेल्या मतदारांना रांगांमध्ये बसण्यासाठी बाकांची व्यवस्था केली जाणार आहे. दिव्यांग तसंच ८५ वर्षांवरील मतदारांसाठी गृहमतदानाची व्यवस्था कायम राहणार आहे.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांबाबत २० तक्रारी दाखल झाल्या असून, प्रत्येक तक्रारीला स्वतंत्रपणे उत्तर दिलं जाईल, असं राजीवकुमार यांनी स्पष्ट केलं. बनावट ध्वनिचित्रफिती चालवून मतदारांची दिशाभूल करणाऱ्यांवर कारवाईचे संकेतही त्यांनी दिले. माध्यमांनी मतदानाचे तसंच मतमोजणीचे कल जाहीर करतांना काळजी घ्यावी आणि यापूर्वीच्या अनुभवांवरून आत्मचिंतन करण्याची गरज राजीवकुमार यांनी व्यक्त केली. ते म्हणाले –

*पहली काऊंटींग साडेआठ बजे शुरू होती है। और हमारे पास प्रमाण है इसबार की आठ पांच, आठ दस, आठ पंधरह पर आने लगा इतने की लीड, इतने की इतने की लीड। ऐसा तो नही है की एक्झीट पोल को जस्टीफाइ करने के लिये शुरू मे वो ट्रेंडस् आ गये। एक विषय ऐसा है जिस पर कुछ ना कुछ मंथन की, कुछ ना कुछ अँड आय ॲम शुअर जब जब इस देश में इस तरह की जरूरत होती है, तो एक सेल्फ करेक्शन हो जाता है। तो सभी रिस्पाँसिबल लोग इसका सेल्फ करेक्शन जरूर करेंगे।*

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं आपल्या निवडणूक चिन्हात साम्य असल्याच्या कारणावरून ट्रम्पेट अर्थात पिपाणी हे चिन्ह गोठवण्याची मागणी केली होती, मात्र ही दोन्ही चिन्हं वेगवेगळी असल्यानं, त्याचा मतदानावर कोणताही परिणाम होत नाही, असं राजीवकुमार यांनी सांगितलं.

*हमने उनको लिखित मे ये भी सूट दी थी की आप खूद हमें बताइये की आप अपने सिंबल को किस तरह से बॅलेट युनिट मे दिखाना चाहते है? उन्होंने कहां था इस तरह से दिखाना चाहते है, दो चॉईस दी थी, जो उनकी पहली चॉईस थी वो हमने मान ली। तिसरी रिक्वेस्ट थी जो एक ट्रम्पेट हेअर स्टाईल थी। कमिशन ने उसी दिन बताया था की वो उससे डिसटर्ब नही करती।*

****

आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये मराठा समाजानं शंभर टक्के मतदान करण्याचं आवाहन मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी केलं आहे. विधानसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर ते आज जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं पत्रकारांशी बोलत होते. विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भातल्या मागण्या मान्य न केल्याबद्दल जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. आमची निवडणुकीसाठीही संपूर्ण तयारी असून याबाबत लवकरच समाजाची बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल असं त्यांनी यावेळी सांगितलं.

****

विधानसभेच्या आगामी निवडणुकीसाठी काँग्रेसनं आज अखिल भारतीय काँग्रेस समितीचे वरिष्ठ निरीक्षक आणि वरिष्ठ निवडणूक समन्वयकांची नेमणूक केली आहे. मुंबई आणि कोकण विभागाचे निरीक्षक म्हणून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक गहलोत आणि डॉ. जी. परमेश्वर काम पाहतील. मराठवाड्यात सचिन पायलट आणि उत्तम कुमार रेड्डी तर विदर्भासाठी भूपेश बघेल, चरणजीत सिंह चन्नी आणि उमंग सिंघर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्रात टी. एस. सिंगदेव आणि एम. बी. पाटील, तर उत्तर महाराष्ट्रासाठी सईद नसीर हुसेन आणि डॉ. अनसुया सीताक्का यांच्याकडे निरीक्षकपदाची जबाबदारी देण्यात आल्याचं काँग्रेसनं पत्रकाद्वारे जाहीर केलं आहे.

****

देशाचे अकरावे राष्ट्रपती आणि मिसाईल मॅन अशी ओळख असणारे भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांची जयंती आज साजरी होत आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. नांदेड इथं जिल्हा ग्रंथालय कार्यालय आणि डिजीटल उपकेंद्रात आज वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचे ग्रंथपाल रविंद्र लाठकर यांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आलं.

****

राष्ट्रीय मागासवर्ग आयोगानं राज्यातल्या आणखी सहा जातींचा इतर मागासवर्गीय यादीत समावेश करण्याची शिफारस केंद्र सरकारला केली आहे. कुलवंत वाणी, कुणबी वाणी, कराडी, कानोडी किंवा कनाडी, नेवेवाणी, सलमानी, तसंच निषाद – मल्ला – मल्लाह किंवा नाविक या सहा जातींचा समावेश केंद्राच्या सूचीत करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारनं आयोगाकडे पाठवला होता. त्यावर गेल्या वर्षी १७ ऑक्टोबरला तसंच यावर्षी २६ जूनला मुंबईत आयोगानं जनसुनावणी घेतली. त्यात सर्व कागदपत्र योग्य आढळल्यानं केंद्र सरकारला ही शिफारस केली असल्याचं राष्ट्रीय मागासवर्ग आयोगानं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

****

बृहन्मुंबई महानगरपालिकेनं आपले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दीपावलीनिमित्त २९ हजार रुपये सानुग्रह अनुदान जाहीर केलं आहे. यामध्ये प्राथमिक तसंच माध्यमिक शाळा शिक्षक, अधिव्याख्याते, शिक्षण सेवक आणि शिक्षकेतर

कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. महापालिकेनं सामाजिक आरोग्य स्वयंसेविकांना १२ हजार रुपये तर बालवाडी शिक्षिका आणि मदतनीसांना पाच हजार रुपये भाऊबीज भेट जाहीर केली आहे.

****

देवळाली ते दानापूर दरम्यान धावणाऱ्या पहिल्या शेतकरी समृद्धी विशेष रेल्वेगाडीला रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून हिरवा झेंडा दाखवला. ही रेल्वे या प्रवासात एक हजार पाचशे किलोमीटरचा टप्पा पार करणार असून शेतकऱ्यांना शेतमाल पाठवण्यासाठी केवळ चार रुपये प्रतिकिलो प्रमाणे दर आकारला जाणार आहे.

****

नांदेड इथल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा आंतरमहाविद्यालयीन 'ज्ञानतीर्थ' युवक महोत्सव १८ ते २१ ऑक्टोबर या कालावधीत होणार आहे. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक सूर्यप्रकाश जाधव यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. विष्णुपुरी इथं सहयोग सेवाभावी संस्थेच्या कॉलेज ऑफ एज्युकेशन इथं नियोजित या महोत्सवात नांदेड, परभणी, लातूर, आणि हिंगोली जिल्ह्यातल्या ९९ महाविद्यालयातले दीड हजार विद्यार्थी कलावंत सहभागी होणार आहेत. लोककला, नृत्य, नाट्य, वाङ्मय आणि ललित कला या वेगवेगळ्या विभागांतर्गत ३०० कला प्रकारांचं या महोत्सवात सादरीकरण होणार आहे. पारितोषिक वितरण समारंभ २१ ऑक्टोबर रोजी होणार असल्याचं, जाधव यांनी सांगितलं.

****

लोकशाही अधिक निकोप आणि बळकट करून तिच्या संवर्धनासाठी युवकांचा मतदानात अधिकाधिक सहभाग महत्त्वाचा असल्याचं छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी म्हटलं आहे. ते आज महात्मा गांधी मिशन विद्यापीठात 'युवा संवाद' कार्यक्रमात बोलत होते. कुलगुरु डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. आपले अधिकार आणि कर्तव्य याप्रती जागरुकता येण्यासाठी युवकांनी मतदानाचा हक्क आणि कर्तव्य पार पाडावं, असं आवाहनही जिल्हाधिकारी स्वामी यांनी केलं.

****

डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीच्या पहिल्या फेरीत भारताच्या पी. व्ही. सिंधूचा सामना चिनी तैपेईच्या खेळाडू सोबत आज संध्याकाळी होणार आहे. पुरुष एकेरीत भारताच्या लक्ष्य सेनचा चीनच्या खेळाडूने १२-२१, २१-१९, २१-१४ असा पराभव केला. महिला दुहेरी प्रकारात रुतपर्णा आणि श्वेतपर्णा पांडा या जोडीला चीनी तैपेई जोडीकडून पराभवाचा सामना करावा लागला.

****

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात तीन कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला उद्यापासून प्रारंभ होत आहे.

****